ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 7 | MARCH - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

"मराठी साहित्याचा स्वातंत्र्य चळवळीशी असलेला ऋणानुबंध "

प्रा. सोनवले आर. आर.
देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय,
मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर.

➢ प्रस्तावना :-

साहित्य हे मानवी जीवनाचा आरसा असतो तर साहित्यिक हा समाज जीवनाचा, मानवी जीवनाचा भाष्यकार असतो. अशा या भाष्यकारांनी मानवी जीवनातील विविध अंगाला स्पर्श केलेला आपल्याला दिसून येतो. त्यास मराठी साहित्य देखील वावगे नाही. कारण मराठी साहित्याने भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास आपल्या लेखणीने चित्रित केलेला आहे असे आपणाला दिसून येते. मराठी साहित्याच्या बाबतीत १९२० हे वर्ष विशेष महत्त्वाचे आहे. साहित्याच्या इतिहासात तो एक कालखंडाचा आरंभ मानला जातो. टिळक युगाचा अस्त्र व गांधी युगाची नांदी असा हा योग होता. टिळकांच्या निधनानंतर महाराष्ट्रात "साधारणाचे युग" सुरू झाले असे म्हटले जाते. "साधारणाचे कि सामान्य माणसाचे" असे अ. ना. देशपांडेनी म्हटले आहे. "१९२० साली आधुनिक भारताच्या इतिहासात चिरस्मरणीय ठरावा असा जीवन समृध्दीचा योग चालून आला. अपूर्वतेबद्दल जिचा जागतिक इतिहाससुध्दा गौरवपूर्ण उल्लेख करता येईल. अशी समाजाच्या सर्व स्तरांना व सर्व अंगांना व्यापून टाकणारी अहिंसक क्रांती भारतात याच वर्षी गांधीजींच्या नेतृत्त्वाखाली सुरू झाली". देशपांडेच्या मते, 'सर्वसामान्य मराठी जनता या प्रवाहाशी समरस झाली. महाराष्ट्रातील सर्वसाधारण साहित्यिक मात्र या प्रवाहापासून अलिप्त राहिला' (देशपांडे अ. ना., १९७९, पृष्ठ १).

रानडे, गोखले, टिळक या तीन नेत्यांच्या निधनानंतर महाराष्ट्रातील अखिल भारतातील नेतृत्त्व समाप्त झाले. टिळक अनुयायांनी गांधीचे नेतृत्त्व स्विकारले होते. त्याच वेळी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या नव्या नेतृत्त्वाचे महाराष्ट्रात चाहूल ऐकू येत होती. म्हणजेच पहिला युगाचा असा व दुसऱ्या युगाचा आरंभी अशी लक्षणे या काळात आढळतात.

वि. का. राजवाडेंच्या 'कादंबरी' हा निबंध, शिवराम जानबा कांबळेंनी भरवलेली पहिली अस्पृश्यता निवारण परिषद (१९०३), अभिनव भारत (१९०४), वि. दा. सावरकर, गोपाळ कृष्ण गोखले 'भारत सेव समाज' (१९०५), वि. रा. शिंदे 'डिस्प्रेड वागास मशिन' महाराष्ट्र साहित्य परिषद वा. गो. आपटे 'आनंद' मासिक (१९०६), किसन फागू बनसोडे 'अस्पृश्य मुलीसाठी शाळा' (१९०७), मुकुंदराव पाटीलांच्या 'कुलकर्णी मिलामृत' प्रकाशन 'लोकशिक्षण' मासिक (१९१२), रविंद्रनाथ टागोरांना 'नोबल पुरस्कार' (१९१३), राजा हरिश्चंद्र (कथा चित्रपट १९१३), गांधीच्या 'जनजीवन', 'यंग इंडिया' नियतकालिकांचे प्रकाशन (१९१९), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'मूकनायक' या वृत्तपत्राचे प्रकाशन (१९२४) व गांधीनी सुरू केलेली असहकार चळवळ ही नव्या युगाची चाहूल होय, म्हणूनच 'गांधी युग' म्हटले जाते.

१९१६ पासून गांधीनी सक्रिय राजकारणात सहभाग घेतला पण ते कोणत्याच गटात सामील झाले नाहीत. कारण 'सत्याग्रह' हे त्यांचे तत्त्व होते. चंपारण खेडा शेतकऱ्यांच्या वा अहमदाबाद येथील गिरणी कामगारांच्या संघर्षात भाग घेतला. १९१९ साली रौलेट ॲक्टच्या विरोधात देशव्यापी सत्याग्रह केला. याच काळात पंजाबमध्ये "जालियनवाला बागेतील हत्याकांड" (१३ एप्रिल १९१९) घडले व सारा देश हादरून गेला. या हत्याकांडामध्ये ५३०-१५०० माणसे जागीच ठार झाली. पुढे एक वर्षाने असहकारितेची देशव्यापी चळवळ सुरू केली. संबंध देशाचे राजकारण बदलून गेले व गांधीचे नेतृत्त्व संपूर्ण देशाने मान्य केले.

दत्तो तुळजापूरांच्या 'माझे रायात्रण' (पहिली आवृत्ती १९२७) या कादंबरीत शेवटच्या भागात रौलट ॲक्टच्या संदर्भात गांधींनी शांततामय सत्याग्रहाच्या घोषणेने जनमाणसावर कसा प्रभाव पडला होता, त्याचे वर्णन केले. वसाहतवादी सत्ता कशा

प्रकारे काम करते याचे एक निरीक्षण कादंबरीकाराने वास्तववादी स्वरूपात मांडले आहे. "जालियनवाला बाग" या प्रकरणात गांधीचा अहिंसामय सत्याग्रह व ब्रिटिशांची कुटिज नीती यांचे चित्रण आले आहे.

बाळ सिताराम मर्ढेकरांच्या "पाणी" (पहिली आवृत्ती १९४८) या कादंबरीत मावळ खोऱ्यातले भगतपूर या नावाचे उजव्या बाजूने कृष्णा व डाव्या बाजूने एक मोठा ओढा यांनी केलेल्या सह्याद्रीचा एक त्रिकोणी कुशीत असलेले एक लहानसे खेडे दाखवले आहे. या कादंबरीत मानवी जीवनाचे अवमूल्यन कसे होते आहे हे दाखवले.

मर्ढेकरांच्या "तांबडी माती व पाणी" कादंबरीचे विश्लेषण करताना सुधीर रसाळांनी म्हटले, "मर्ढेकरांच्या या दोन्ही कादंबऱ्यांमध्ये प्रगमनशीलतेमुळे गमावल्या गेलेल्या चांगल्या शुभ गोष्टीबद्दल दु:ख व हळहळ प्रकट झाली आहे. तसेच घडवलेल्या नव्या जीवनात व मूल्यव्यवस्थेत चांगल्यापेक्षा वाईटाचे, शुभापेक्षा अशुभाचे प्रमाण जास्त असल्याबद्दलचे दु:ख आणि हळहळ प्रकट झाली आहे. धरण योजनाचा फटका लाखो आदिवासींना बसला, त्यांचा उध्दवस्त संसाराने ते देशोधडी लागले. तरी संबंध देशाच्या विकास घडवून आणायचा असेल तर काहींना त्यासाठी किंमत मोजावी लागतेच असे चंडपणाने विकासाचे तत्वज्ञान त्यांना पाडण्यात येते".

निस्थापन होते पण पुजास्थापन होत नाही. विश्वास पाटील यांच्या "झाडा झडती" (आवृत्ती पहिली १९९१) या कादंबरीचा विषय धरण व धरणग्रस्तांचे पुनर्वसन हाच आहे.

गांधीवादाचा औद्योगिक केंद्रीकरणाला व कारखानादारीतून निर्माण होणाऱ्या आर्थिक विषमतेला विरोध आहे, यांत्रिक उत्पादनाला विरोध नाही. गांधीनी यंत्राला विरोधा केला तो ते आर्थिक शोषणाचे एक साधन आहे. म्हणून गांधीनी "हिंद स्वराज्य" (१९०९) या आपल्या ग्रंथात यंत्र संस्कृतीला विरोध केला तो याच भूमिकेतून. मानवाच्या भौतिक सुखापेक्षा त्याच्या नैतिक विकासाला त्यांनी अधिक महत्त्व दिले. वि. म. दांडेकरांचा "गांधीवादी अर्थव्यवस्था : आर्थिकेत्तर उद्दिष्टांकडे जाण्याचा मार्ग" हा एक निबंध आहे, त्यात गांधीप्रणित अर्थव्यवस्थेचे आकलन होण्याचे दृष्टीने निबंधकाराने गांधीच्या लिखाणाचा भरपूर वापर करून नंतर त्यांचा परामर्श घेतला आहे.

साने गुरूजी जन आंदोलनात सामील झाले व सत्याग्रह करून तुरूंगात गेले. त्यांच्या "पत्री" काव्यसंग्रहातील कविता १९२५ ते १९३५ या काळातच बहुतेक कविता निरनिराळ्या तुरूंगात लिहिली गेलेली आहे. आपले वैयक्तिक आयुष्य व आपले लेखन या संदर्भात साने गुरूजीची काही एक भूमिका होती ती त्यांच्या विविध कवितांतून दिसते. "माझे ध्येय" या कवितेत या भूमिकेचा स्पष्ट उच्चार झालेला आहे. "कधी कुणाचे अश्रुंनी भरलेले डोळे मला पुसू दे आणि तो हसू दे". एकूणच्या त्यांच्या कवितेवर गांधी विचाराचा समकालीन वातावरणाचा प्रभाव जाणवतो. "पत्री" या संग्रहाच्या चौथ्या खंडात "सत्याग्रही" हे खंडकाव्यावरून दिसतो. तसेच नेहरूंचा युक्तिवाद या दोहोंचा ही प्रभाव जाणवतो. गुरूजींनी "स्वातंत्र्य" ही महत्त्वाची प्रेरणा मानलेली आहे. मग ती आर्थिक स्वातंत्र्य असो वा राजकीय, धार्मिक असो. गुरूजींना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य अभिप्रेत आहे. "देशादेशी सकळ जनता पेटलेली पहाती । हिंदुस्थानी परि न उठती सर्व झोपाच घेती" असा त्याचा निष्कर्ष आहे. गुरूजींच्या देशभक्तीपर कवितांतून सतत "स्वातंत्र्य" व "आत्मत्याग" याचा उच्चार झालेला आहे. "सत्याग्रही" खंडकाव्यातून याच "आत्मत्याग" या तत्त्वाचा चिंतनात्मक आविष्कार आढळतो. असे असले तरी गांधीवादाचा महाराष्ट्रातील विशेषत: मराठी साहित्यावरील प्रभावाचा वेध द. दि. पुंडेंनी "गांधीवाद आणि आधुनिक मराठी साहित्य" पुस्तकात केला आहे.

गांधीच्या "आत्मकथा" प्रकाशित होण्याच्या एक वर्ष आधी म्हणजे १९२७ सावरकरांचा "माझी जन्मठेप" आत्मवृत्तात्मक ग्रंथ प्रकाशित झाला. १९११-१९२० या काळात अंदमानात भोगलेला कारावास हा या ग्रंथाचा विषय आहे. तुरूंगात सर्व प्रकारे छळ, अतिशय शारिरीक कष्ट व मानसिक यातना सोसत असताना सावरकरांना कविता लिहिण्याची ऊर्मी नष्ट झाली नाही, भिंतीवर स्तंभ आखून लेखन केले. सातव्या भागाच्या सर्व भिंती म्हणजे एकेक ग्रंथ असे. "कमला" बहुतेक त्या सात भागाच्या भिंतीवर रचली गेली. सप्तर्षि चांदोबा चांदोबा भागलास का ? सायंघंटा, आकांक्षा, विरहोच्छास इत्यादी कविता लिहिल्या. "मातृभूमी" हा त्यांचा कवितेचा मुख्य विषय आहे असे नाही तर जीवित कार्यात अस्तित्त्वाचाच विषय आहे. "स्वतंत्रतेचे स्तोत्र" कवितेत स्वातंत्र्याची अदम्य आकांक्षा व मातृभूमीवरची उत्कृष्ट भक्ती व्यक्त झाली आहे.

१९२६ मध्ये असहकारितेची चळवळ मागे घेतल्यावर द्विराष्ट्रवादाचा मुद्दा पुढे आला व जातीयवादाने डोके वर काढले व हिंदू - मुसलमान या दोन्ही धर्मात आपल्या अस्तित्त्वासंबंधीचे भय निर्माण झाले. याच काळात हिंदूमध्ये "संघटन", "शुध्दी" ची चळवळ सुरू झाली तर मुसलमानात "तंजीम" व "तबलिक" चळवळ सुरू झाली व दंगलीच्या रूपाने परस्परांतील द्वेषभावनेचा आविष्कार झाला व १९४० मध्ये स्वतंत्र मुस्लिम राष्ट्राची मागणी करण्यात आली. ब्रिटिशांनी ही मागणी मान्य केली व १९४७ ला देशाची फाळणी झाली व १९४८ मध्ये गांधीची हत्या झाली. व्यंकटेश माडगुळकरांनी "वावटळ" (पहिली आवृत्ती १९६४) या कादंबरीत या काळातील या घटनांचे चित्रण केले.

असहकाराच्या चळवळीपासून ते सविनय कायदे भंगाच्या चळवळीपर्यंतचा कालखंड राष्ट्र, हिंदूत्त्व, ब्राम्हण-ब्राम्हणेत्तर समाज जीवन, व्यक्ती जीवन, स्त्रीयांची सुधारणा, अस्पृश्यता निवारण इत्यादी विषयीच्या विचारवादांनी गजबजलेला होता. वा.

मा. जोशी, र. धो. कर्वे, श्रीधर केतकर, गडकरी, मुकुंद पाटील, के. सी. ठाकरे, श्री. म. माटे, ना. ह. आपटे, दिवाकर, बालकवी इत्यादी समकालीन लेखक, कवी, नाटककार, विचारवंत, सामाजिक चळवळीच्या, साहित्याच्या व विचारांच्या क्षेत्रात काम करीत होते. यानंतरच्या पिढी लिहू लागलेली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गिरीश, ना. सि. फडके, माधव पटवर्धन, विनोबा भावे, वि. स. खांडेकर, र. वा. दिघे, श्रीपाद डांगे, रा. त्र्यं. माडखेलकर, पु. य. देशपांडे, साने गुरूजी, यशवंत इत्यादींचा समावेश होतो.

याच काळात नियतकालिके सुरू झाली, मूकनायक, किर्लोस्कर, रत्नाकर विद्या सेवक, बहिष्कृत भारत, लोकशिक्षण, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, सत्यकथा, प्रतिभा, मनोहर, सह्याद्री इत्यादी नियतकालिकांतून वैचारिक लेखनप्रमाणेच कविता, कथा, कादंबऱ्याही प्रकाशित होत असत.

पु. य. देशपांडे "बंधनाच्या पलिकडे" (१९२७) ही व्यक्ति स्वातंत्र्याची मांडणी करणारी कादंबरी आहे. प्रीतीबरोबरच समाजातील लैंगिक नीतीविषयी देखील या कादंबरीत भाष्य केले आहे. वेश्येबरोबर एखाद्या पुरूषाने राहणे हे समाजाला मान्य असते पण तिच्याशी विवाह केला की समाज खवळतो ते "बंधनाच्या पलिकडे" मध्ये दाखविले आहे.

केतकरांच्या "ब्राम्हणकन्या" (१९३०) या कादंबरीत विवाह नावाचा संस्कार न करता स्त्री-पुरूषांनी पती-पत्नी म्हणून राहते ते इष्ट कसे आहे हे सांगितले आहे तर "गोंडवनातील प्रियवंदा" (१९२६) या कादंबरीत प्रियवंदा प्रगतशील तरूणी आहे तर शारदाबाई ही शिक्षिका आहे. त्यामुळे स्त्री स्वातंत्र्य त्या पात्र चित्रणातून लक्षात येते. त्यांच्या सर्वच कादंबऱ्यामधून पात्रांची जीवननिष्ठा नव्या मार्गाने प्रकट होताना दिसते. "विलक्षणा" कादंबरीत मधुमालती ही संकर्षण आठवले नावाच्या चित्रकाराबरोबर पळून जावून लग्न करते.

वा. म. जोशींनी "सुशीलेचा देव" (१९३०) कादंबरी लिहित होते. राजसंस्था ही जशी ईश्वरकृत नाही तशी विवाहसंस्था ही नाही, ती देवाने केलेली नाही व दिव्य नाही, केवळ मानवकृत आहे. विधवा पुनर्विवाह संमतिवयाचा कायदा इथपर्यंत एकूणच विवाह संस्थेविषयीचा पुनर्विचार इथपर्यंत मराठी विचारवंताचा व ललित लेखकांचा प्रवास झालेला दिसतो. या काळातील महत्त्वाचे कादंबरीकार वा. म. जोशी रागिणी (१९१५), आश्रमहरिणी (१९१६), नलिनी (१९१९), इंदु काळे व सरला भोळे (१९३५) इत्यादींमधून स्त्री जीवनात होत गेले बदल दाखवले आहेत.

टिळक, गांधी या काळातील सामाजिक, राजकीय तद्नुषंगिक वैचारिक स्थित्यंतराच्या दृष्टीने "सुशीलेचा देव" महत्त्वाची कादंबरी आहे.

१९०० धो. के. कर्वेंनी स्त्री शिक्षण संस्था सुरू केली, १९२६ अखिल भारतीय महिला परिषदेची स्थापना, १९२९ बालविवाह प्रतिबंध कायदा, १९२० असहकाराच्या आंदोलनात स्त्रियांचा सहभाग, १९२०-१९३० राष्ट्रीय सभेच्या कार्यातील स्त्रीयांचा सहभाग, १९३० सविनय कायदे भंगमध्ये महाराष्ट्रातील स्त्रीयांचा सहभाग इत्यादी भागाचा विचार करणे गरजेचे आहे.

इतर लेखिकांनी गांधीवादी विचारसरणीचा स्वीकार केलेच्या आपल्या लेखणीतून आहे. विभावरी शिरूरकर, गीता साने, प्रेमा कटंक, मालती दांडेकर वा इतर लेखिकांचा विचार करता येईल.

पुढे मात्र गांधीवादाकडून अनेक लेखक मार्क्सवादाकडे झुकलेले दिसतात. वरेरकर, वि. स. खांडेकर, वि. बा. हडप्प, साने गीता, प. त्रि. सहस्त्रबुध्दे कवीच्या बाबतीत शरदचंद्र भुक्तीबोध यांचा विचार करता येईल.

याशिवाय वि. रा. शिंदे "अस्पृश्यतेचा प्रश्न" वा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा नियतकालिके, त्यांची आंदोलने, त्यांचे लेखन इत्यादी परिणाम मराठी साहित्यावर झाल्याचे प्रकर्षाने जाणवते. त्यातून पुढे ग्रामीण, दलित, प्रायोगिक नाट्य रंगभूमी, आदिवासी इत्यादी साहित्य प्रवाह रूढ झाले.

➢ समारोप :-

मराठी साहित्याचा वेध घेतला असता आपल्याला असे दिसून येते की, मराठी साहित्याने स्वत:भोवती विशिष्ट असे वर्तुळ निर्माण करून घेतलेले नाही. कुठलाही विषय त्याज्य मानला नाही, हेच आपल्या नजरेस पडते. एकूणच मराठी साहित्याने स्वातंत्र्य चळवळ व बदल, वादळ, क्रांती, प्रतिक्रांती इत्यादींचा समर्थपणे वेध घेताला, याचे भान आपणांस येईल हे निश्चित.

संदर्भ ग्रंथ सूची

१) दलित साहित्य, उद्गम आणि विकास, डॉ. योगेंद्र मेश्राम.
२) मराठी विश्वकोष, लक्ष्मणशास्त्री जोशी.
३) मराठी श्वेतकाल कादंबरी, डॉ. मृणालिनी बांडे.
४) मराठी साहित्य, इतिहास आणि संस्कृती, वसंत डहाके.
५) अर्वाचीन मराठी साहित्याचा चिकित्सक आढावा, प्रदक्षिण खंड - १.